# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/२०२४** **दिनांक १०/१०/२०२४**

**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.१०.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२३६३/२०२४, दि.०९.१०.२०२४ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.१०.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

सभेचे सुरुवातीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने, टाटा समुहाचे माजी अध्यक्ष व भारतातील उद्योग जगताचे महानायक, पद्मविभुषण रतन नवल टाटा यांच्या दु:खद निधनाबद्दल भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

---

विषय नं.१ दि.२९.०८.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५५६ दि.२९.०८.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.२ दि.०९.०९.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५५७ दि.०९.०९.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.३ दि.१२.०९.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५५८ दि.१२.०९.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.४ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. एल.आय.सी. ग्रुप ग्रच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरण करणेबाबत.

निर्णय क्र. ५५९/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

२. **आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या तीन वर्षाकरीता पुर्व लेखापरिक्षक (Pre-Auditor) नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

३. **आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

४. **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओटी विभागाकरिता Sonicision (Medtronic) कंपनीचे Monopoly असलेले Probe खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

५. **श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर उपचार दरातील व संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**६. श्री साईबाबा रुग्णालयाकरिता लागणारे वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील साहित्य इ. खरेदीकामी दर निश्चिती(Rate Contract) करणेस व याकामी येणा-या अंदाजित एकूण रक्कम रु.४२,३४,४३,२६८/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**७. श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पद्धतीने करून घेणेकामी (सन २४-२५) या एक वर्ष कालावधीकरिता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**८. व्दारावती भक्तनिवास इमारतीचे आतील खराब झालेले रंगकाम करणेकामाचे रु.१६,५९,७७१/- या निम्नतम दराचे निविदाधारक डिसेंट डेकोरेटर्स पुर्ण यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**९. व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील तळमजल्याचे पार्कींगमधील प्रसादभोजन व्यवस्थेसाठी ॲल्युमिनियम पार्टीशन करणेकामाचे रु.९,१०,१५७/- या निम्नतम दराचे निविदाधारक कौस्तुभ दिनेश कुलकर्णी, शिर्डी यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/९ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**१०. श्रींचे आरतीकरीता सामान्य रांगेतील ०२ साईभक्तांना आरतीचे वेळी पुढे उभे करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/१० चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**११. साई धर्मशाळा विभागाकडील जुन्या फायबर फोम टु फोल्ड मॅट्रेस गाद्यांची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/११ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-साई धर्मशाळा)**

---

**१२. श्री पुण्यतिथी उत्सव-२०२४ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांची नावे निश्चीत होणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५९/१२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५ मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.१५/२०२० मधील होणा-या निर्णयास अधीन राहून सध्याचे सिक्युरीटी ठेकेदार यांना दि.०१.०१.२०२५ ते दि.३०.०६.२०२५ अखेर पर्यंत सध्याचे आहे त्याच दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६०** दि.०१.०१.२०२५ ते दि.३०.०६.२०२५ अखेर पर्यंत सध्याचे आहे त्याच दरात मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मंजुरी घेण्यात यावी.

**(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.६ श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे विनंतीनुसार वैयक्तिक साईसेवक योजना सुरु करणे व पुर्वीच्या साई सेवक योजना नियमावलीमध्ये अंशत: बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.५६१** **प्रथम साईसेवकांची सेवा कुठे-कुठे घेता येईल या करीता प्रभाग निश्चीत करावे, किती मनुष्यबळ लागणार आहे हे निश्चीत करावे व त्यानुसार गट तयार करावे यासह सविस्तर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.७** **सन २०२४-२५ करीता (माहे ऑक्टोबर-२०२४ ते सप्टेंबर-२०२५) अखरे बुंदी प्रसाद तयार करुन, मशिनव्दारे उत्पादन तारखेचे शिक्के मारणे व पॅकींग करणे इ.कामांची उक्त्या मजुरी दरांची अंदाजे रक्कम रुपये ९३ लाख मात्रचे खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५६२** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मंजुरी घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.८** **संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती विभागाकरीता ऑक्टोबर-२०२४ ते मार्च-२०२५ साठी खोबरा पावडर खरेदीकामी प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६३** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.९** **संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती विभागाकरीता ऑक्टोंबर-२०२४ ते मार्च-२०२५ साठी हरबरा दाळ खरेदीकामी प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६४** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१०** **सन २०२४-२५ वर्षाकरीता पाणी शुध्दीकरणाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर व स्विमिंग पुलासाठी TCCA-90 क्लोरीन पावडर खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११ श्री विरभद्र मंदिर बिरोबा बन, शिर्डी येथील श्री विरभद्र महाराज यात्रेतील कुस्ती हगामाकरीता रु.१,००,०००/-मात्र रक्कम देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१२ श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात विविध व्यवसाय करणेकामी स्टॉल/मोकळया जागा वापरास परवानगी / मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६७ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३ श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात विविध ठिकाणी चालवत असलेले जागा/गाळे/ कियॉस्कच्या वापरास पुढील ११-११ महिने कालावधीसाठी मुदत वाढवुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.५६८ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१४ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील जमीन गट नं.८७ पै. क्षेत्र २४.५ आर व गट नं.८८ पै.क्षेत्र २७.५ आर असे एकुण ०.५२ आर क्षेत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी पुढील ३० वर्ष कालावधीकरीता जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५६९ प्रस्ताव मंजुर. प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मंजुरी घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५** **श्री साईबाबा हॉस्पिटल एम.आर.आय.विभागाचे समोर रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांचे ऊन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी बैठक व्यवस्थेसह शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.५७० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साईप्रसादालय इमारतीच्या छताचे फुटलेले कौले बदलून नुतनीकरण करणेकामाचे ठेकेदार श्री यशवंत दिनकर गाडे, नाशिक यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**निर्णय क्र.५७१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१७** **मौजे निमगांव को. येथील संस्थान मालकीच्या साईधर्मशाळा (गट नं.१७२) परिसरातील पुर्वेकडील पार्कीगमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी प्रसाधनगृह बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.५७२ प्रस्ताव मंजुर. स्वच्छतेचे काम उपलब्ध स्वच्छता कर्मचारी यांचेकडून करुन घेण्यात यावे.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१८** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरात नव्याने लॉण्ड्री युनिट उभारणी करणेकरीता प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५७३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नव्याने केसपेपर इमारत उभारणी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५७४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२०** **राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी बस स्थानकावर येणारे प्रवासी साईभक्तांसाठी संस्थानकडून विनामुल्य पाणी पुरवठा होणेबाबत आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**निर्णय क्र.५७५** **टंचाई कालावधी वगळता प्रतिदिन दोन तास विनामुल्य पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२१** **नवीन दर्शनरांग इमारतीतील FBS (Full Body Scanner) BS (Baggage Scanner) यांचे एक वर्ष कालावधीकरीता कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**निर्णय क्र.५७६** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२२** **सन २०२५ ते २०२७ चे साईलीला व्दै मासिके अंक (मराठी व हिंदी/इंग्रजी) व वितरणासाठी पाकीटे / छपाईकामी ई-निविदा राबविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५७७** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मंजुरी घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.२३** **संगणक दुरुस्ती देखभाली अंतर्गत संगणकीय व अनुषंगीक साहित्य आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.५७८** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२४** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा रक्कम रु.७,४७,०८२/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५७९** **चर्चेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासुन फेर सादर करावे.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२५** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा रक्कम रु.१६,२२,२२६/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५८०** **चर्चेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासुन फेर सादर करावे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२६** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा रक्कम रु.६,७९,३४१/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५८१** **चर्चेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासुन फेर सादर करावे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२७** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय परतावा रक्कम रु.४,३५,१५३/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५८२** **चर्चेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासुन फेर सादर करावे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८** **श्री.नितीन सोपान शिंदे, ज्यु.एक्स-रे टेक्निशियन, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५८३** **प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालया मध्ये व Previu Health PVT LTD यांच्या विद्यमाने श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये कॅन्सर रुग्णांचे निदान व उपचार सुरू करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८४** **तहकुब. सादरीकरण करण्यात यावे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३०     माहे जून-२०२४ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५८५ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१     माहे जुलै-२०२४ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५८६ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

आयत्या वेळेचा

**विषय नं.१     आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांना भगवदगीता वितरणासाठी स्टॉल/गाळा मिळणेबाबत श्री. सुंदर चैत्यनदास,अध्यक्ष इस्कॉन, कोपरगाव यांचा अर्ज.**

**निर्णय क्र.५८७  प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.२     साई निर्माण ॲकडमी, शिर्डी यांना अग्नीशमन जवळील मैदानावर पोलीस भरतीचा सराव करण्यासाठी रोज दोन तास परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५८८  धोरणाअभावी प्रस्ताव नामंजुर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.३     श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाकरीता विविध खेळाची मैदाने विकसीत करणेकामी लालमाती खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.४** **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्र.१(संस्थान) कामाचे ३ रे धावते देयक व ४ थे अंतिम देयक म.जी.प्रा.विभाग, संगमनेर यांनी प्रमाणित केलेप्रमाणे ठेकेदार दि. इंडियन हयुम पाईप कं.लि.पुणे यांना अदा करणेस मान्यता मिळणेस तसेच ठेकेदार यांनी मागणी केलेली अतिरिक्त रक्कम नाकारणेस व ठेकेदार यांचेकडून टप्पा क्र.१ चे काम काढून घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९० तहकुब.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.५** **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा भक्तनिवास करीता लोखंडी कॉट खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९१ तहकुब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.६** **ॲक्सिस बॅंकेमध्ये संस्थानचे बचत खाते उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.५९२ तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

**विषय नं.७** **श्रींचे आरतीकरीता सामान्य रांगेतील दोन साईभक्तांना आरतीचे वेळी पुढे उभे करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९३ तहकुब.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.८ साईआश्रम भकतनिवास विभागाकडील जुने कॉट जाहिर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५९४ तहकुब.

(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.९ संस्थानचे विविध विभागाकरीता संगणकीय प्रि.प्रिंटेड व कार्यालयीन जनरल छपाई बाबत.

निर्णय क्र.५९५ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकामी कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून संस्थानचे, शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु.४९,९२,७५०/-मात्र (सर्व करांसहित) खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मागील दराप्रमाणे पुरवठाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून सेवा-सुविधा सुरु ठेवणेकामी मुदतवाढ मिळणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५९६ पुढील निर्णय होईपर्यंत सध्याचे दरात व अटी /शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ मा.तदर्थ(Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार विद्युत विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या तसेच तंत्रज्ञानामध्ये / उपकरणांमध्ये होणारे बदल विचारात घेता विद्युत क्षेत्रातील “तज्ञ सल्लागार” यांची ०५ वर्षाकरिता नेमणूक करणेकामी उघडण्यात आलेल्या

**ई-निविदांमधील “एल-१” निविदाधारक मे. कंपास कन्सल्टन्सी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, पुणे यांनी चर्चेअंती देऊ केलेले १.५१ % (सर्व करांसहित) दर स्वीकारून त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९७ एनर्जी ऑडीट व सेफ्टी ऑडीट करुन फेर प्रस्ताव सादर करावा. कार्यकारी अभियंता, नाशिक (विद्युत) यांचेकडून अभिप्राय घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ दोन्ही हॉस्पिटलकरीता संगणके, लॅपटॉप, यु.पी.एस. व प्रिंटर्स खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत वाणिज्यीक निविदेतील (Commercial Bid) निम्नतम दरधारक निविदाधारक यांनी दरांबाबतच्या चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेल्या सुधारीत दरांप्रमाणे त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९८ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारिका / परिचारक (स्टॉफनर्स) तसेच सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांचे दि.०७.१०.२०२४ रोजीचे कामबंद आंदोलनाबाबत.**

**निर्णय क्र.५९९ तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ संस्थानचे मंजुर पदांचे वर्गीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.६०० तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सलग १० वर्ष सेवा झालेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कामगारांना संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेकामी विभागीय परिक्षा आयोजित करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०१ तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता जुन Ventilator व Fully Automatic Biochemistry Analyser Machine बायबॅक करुन नविन खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६०२ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील प्रस्तावीत भांडार इमारत बांधकाम करणे कामाचे रु.८,११,६५,१५८.३५ या निम्नतम दराचे निविदाधारक मातोश्री इंटेरियर्स, अहमदनगर यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.६०३ सी.ए.चे अधिन प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१८ माहे ऑगस्ट-२०२४ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६०४ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२० दि.०१.०७.२०२४ ते दि.३०.०९.२०२४ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६०६ धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावेत.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२१ संस्थानचे मौजे शिर्डी सर्व्हे नं.५४,५५ मध्ये साईभक्तांसाठी स्वच्छता गृहाचे बांधकाम करणे व वाहनतळ विकसीत करणेकामी ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार सागर राजेंद्र रोकडे यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६०७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५५६ ते ६०७ सर्वानुमते घेण्यात आला.**
**यानंतर दुपारी ०१.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्‌तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**